# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरू..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

वर्ष-२ ■ अंक-९ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ३ ऑक्टोबर २०२२ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# मुलं पळविणारी टोळी ही अफवाच

## काही संशयित वाटल्यास नागरिकांनी पोलिसांना कळवावे, कायदा हातात घेऊ नये!

### दिवा पोलीस चौकीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहाजी शेळके यांचे आवाहन!



दिवा:-मुलं पळविणारी टोळी सक्रिय असल्याचे मेसेज सोशल मीडियावर व्हायरल होत असतानाच गुरुवारी दिव्यात एका रहिवाशांला गैरसमजातून जबर मारहाण केल्याचा प्रकार उघडकीस आला.यानंतर दिवा पोलिसांनी मारहाण करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यास सुरुवात केली असून मुलं पळविणारी टोळी ही अफवा असल्याचे सांगितले आहे.

दिवा पोलीस चौकीचे सहायक पोलिस निरीक्षक शहाजी शेळके यांनी याबाबत **दिवा न्यूज** सोबत संवाद साधताना सांगितले की, सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या अफवा मुळे नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले.त्या लहान मुलींची आई तेथे उपस्थित असताना गैरसमजातून काही जणांना मुलं पळविणारी टोळीतील व्यक्ती समजून एका इसमाला मारहाण केली.अशा प्रकारची कृत्ये ही गैर असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये.जर कुठे काहीही संशयास्पद दिसून आल्यास पोलिसांना तात्काळ कळवावे,दोन मिनिटात पोलीस त्या जागेवर पोहचतील.परंतु गैरसमज करून घेऊन निरपराध लोकांवर हल्ले करणे योग्य नाही असे शेळके यांनी सांगितले. नागरिकांत ज्या अफवा पसरल्या आहेत त्यावर प्रबोधन करण्याचे काम आम्ही करत आहोत.नागरिकांनी सतर्क असायलाच हवे मात्र कोणत्याही परिस्थितीत कायदा हातात घेऊ नये.संशयास्पद काही आढळल्यास पोलिसांना रिपोर्ट केल्यानंतर त्यावर योग्य ती कारवाई केली जाईल असेही शेळके म्हणाले.दिवा शहरात कोणतीही लहान मुले पळविणारी टोळी नसून ही सोशल मीडियावर व्हायरल झालेली अफवा आहे असे शेळके म्हणाले.

## भाजप स्वबळावर लढल्यास दिव्यात भाजपचे नगरसेवक निवडून येतील-रोहिदास मुंडे



**ठाणे:-आगामी पालिका निवडणुकीत दिवा शहरात भाजपने स्वबळावर लढावे अशी स्थानिक कार्यकर्त्यांची मागणी असून स्वबळावर लढल्यास दिव्यात भाजपचे सर्वाधिक नगरसेवक निवडून येतील असा विश्वास दिवा भाजपचे मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांनी व्यक्त केला आहे.**

दिवा शहरात भाजपचा मोठा मतदार आहे.मागील निवडणुकीत भाजप क्रमांक दोनचा पक्ष राहिला आहे.शिवसेनेत असलेल्या भांडणामूळे नागरिक त्रस्त झाले असून भाजप हाच जनतेच्या प्रश्नांना न्याय देऊ शकतो असे लोकांचे मत आहे. नागरिकांच्या प्रश्नावर भाजपने आंदोलने करत अनेक प्रश्न सोडविण्यास मदत केली आहे.शहराचे नियोजन बद्ध विकासाचे धोरण भाजपने मांडले आहे.त्याच बरोबर भाजप जिल्हाध्यक्ष निरंजन डावखरे,आमदार केळकर यांनी दिव्यातील प्रश्न वारंवार शासन दरबारी लावून धरले आहेत.परिणामी येथील जनतेची साथ भाजपला मिळण्याची शक्यता अधिक आहे असे रोहिदास मुंडे यांनी म्हटले आहे.भाजपकडे दिवा शहरातील सर्व जागांवर मातब्बर उमेदवार असून जनतेत भाजपच्या पदाधिकारी यांचे मत चांगले आहे. लोकांमध्ये मिसळणारे कार्यकर्ते भाजपकडे असल्याने मंत्री रवींद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष निरंजन डावखरे व आमदार केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा शहरात भाजपच्या पक्ष संघटनेचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला आहे.शहरात लोकांच्या हिताचे सर्वाधिक उपक्रम भारतीय जनता पक्षाच्या वतीने राबविण्यात येत असल्याचे रोहिदास मुंडे यांनी यावेळी सांगितले. पक्ष नेतृत्वाने स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतल्यास दिवा भाजप शहरात परिवर्तन घडवून दाखवेल असा विश्वास रोहिदास मुंडे यांनी व्यक्त केला आहे.

## समर्थ नगर येथील पाण्याच्या सबलाईन आणि रस्त्याच्या कामाची आ.राजू पाटील यांनी केली पाहणी




**दिवा:-**शहरातील समर्थ नगर येथील पाण्याच्या सबलाईन आणि रस्त्याच्या कामाची आ.राजू पाटील यांनी पाहणी केली. दिव्यातील समर्थ नगर परिसरात असलेल्या मुख्य रस्त्यावरून मुंब्रादेवी कॉलोनी, रिलायन्स टॉवर या भागात पाणी वाहून नेण्यासाठी प्लास्टिकचे पाईप टाकण्यात आले होते. हे पाण्याचे पाईप मुख्य रस्त्यावर असल्याने ते वारंवार फुटून संपूर्ण रस्त्यावर चिखल पसरला जात होता,

शिवाय पाण्याची मोठ्या प्रमाणावर नासाडी होत होती. रस्त्यावर असलेल्या सततच्या पाणी आणि चिखलामुळे रस्ता देखील खराब झाला होता, त्यामुळे या रस्त्यावरून प्लास्टिकचे पाईप काढून एक वेगळी सबलाईन टाकण्यात यावी तसेच खराब झालेला रस्ता पुन्हा नव्याने बांधण्यात यावा अशी मागणी दिवा मनसे तर्फे पत्रव्यवहार करून वेळोवेळी करण्यात आलेली होती.

मनसे दिवा शहर अध्यक्ष तुषार भास्कर पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त आणि पाणी खात्याचे अधिकाऱ्यांची याच विषयावर भेट घेऊन निवेदन दिले होते. गणेशोत्सवाच्या काळात दिवा मनसेच्या पाठपुराव्यानंतर महापालिकेने या रस्त्याची खडी टाकून तात्पुरती डागडुजी केली होती.

आता पावसाळ्यानंतर अखेर नवीन सबलाईन टाकण्याच्या आणि नवीन रस्ता बनवण्याच्या कामाला महापालिकेकडून सुरवात करण्यात आली आहे. त्यामुळे आता तरी या परिसरातील लोकांची चिखलाच्या रस्त्यातून सुटका होईल म्हणून त्यांनी दिवा मनसेचे आभार व्यक्त केले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com

सोमवार, ३ ऑक्टोबर २०२२



## ठामपाचा ४० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा



**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेचा ४० वा वर्धापन दिन आज मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पालिका मुख्यालयात अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी आणि अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे यांच्या हस्ते महापालिकेच्या ध्वजाचे आरोहण झाले. त्यानंतर, अग्निशमन दल, सुरक्षा दल, टीडीआरएफ, एमएसएस यांनी संचलन केले.



ध्वजारोहण व संचलन सोहळ्यानंतर, नरेंद्र बल्लाळ सभागृहात पूजनीय नेत्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले. यावेळी, परिवहन समिती सभापती विलास जोशी, माजी विरोधी पक्ष नेते अशरफ शानू पठाण, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे, उपायुक्त मारुती खोडके, बाळासाहेब चव्हाण, वर्षा दीक्षित, गजानन गोदेपुरे, दिनेश तायडे, अग्निशमन विभागाचे प्रमुख गिरिश झळके, उप नगर अभियंता शुभांगी केसवानी तसेच इतर वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी आदी उपस्थित होते. त्याचप्रमाणे, वर्धापन दिनाचे औचित्य साधून शहरातील थोर नेत्यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

## जिल्हा वार्षिक योजनांचा निधी शंभर टक्के खर्च करण्यावर भर द्यावा – पालकमंत्री शंभुराज देसाई



## नवनियुक्त पालकमंत्र्यांनी घेतला जिल्हा नियोजन निधीचा आढावा

**ठाणे :** जिल्ह्यातील विकास कामांसाठी दिलेला जिल्हा वार्षिक योजनांचा निधी हा वेळेत आणि शंभर टक्के खर्च होईल याची दक्षता संबंधित यंत्रणांनी घ्यावी. तसेच आदिवासी पाड्यांमधील साकाव, रस्ते, आरोग्य, शिक्षण, वीज, पाणी या मूलभूत सुविधा निर्माण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश जिल्ह्याचे नवनियुक्त पालकमंत्री तथा राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी गुरुवारी येथे दिले.

पालकमंत्री पदी नियुक्तीनंतर प्रथमच देसाई हे जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी जिल्हा वार्षिक योजनांचा आढावा घेतला. तसेच तत्पूर्वी जिल्ह्यातील विविध लोक प्रतिनिधींशी चर्चा करून त्यांच्या सूचना जाणून घेतल्या. जिल्हा नियोजन आढावा बैठकीस जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, अतिरिक्त जिल्हाधिकारी मनिषा जायभाये, निवासी जिल्हाधिकारी सुदाम परदेशी, जिल्हा परिषदेच्या प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. भाऊसाहेब दांगडे, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त दिलीप ढोले, सहपोलीस आयुक्त दत्तात्रय कराळे, संजय जाधव, जिल्हा नियोजन अधिकारी सुनील जाधव आदी यावेळी उपस्थित होते.

जिल्हा नियोजनच्या सन २०२१-२२ या वर्षाच्या निधीचा खर्चाचा आढावा आणि सन २०२२-२३ चे नियोजन याबद्दल पालकमंत्री देसाई यांनी आढावा घेतला. देसाई म्हणाले की, या वर्षीच्या नियोजनासाठी खूप कमी वेळ असल्यामुळे एक वर्षाचे काम सहा महिन्यात करावे लागणार आहे. त्यामुळे यंत्रणांनी गतीने काम करावे व परिपूर्ण प्रस्ताव तयार करून कार्यवाही करावी. जिल्हा नियोजनमधील दिलेला नियतव्य शंभर टक्के खर्च होण्यासाठी शिस्तबद्धपणे नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

## 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' अभियानात सात हजार महिलांची आरोग्य तपासणी

ठाणे: माता सुरक्षित तर घर सुरक्षित या अभियानात ठाणे शहरात अवघ्या दोन दिवसात तब्बल सात हजार महिलेची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. यामध्ये टेंभीनाका येथील सुरु केलेल्या शिबिरात तपासात सुमारे चार हजार महिलांनी आपल्या आरोग्य तपासणी करून घेतली आहे. या दोन दिवसात, टेंभीनाक्यावर ३ हजार ९८७ महिलांना 'देवीचा प्रसाद' म्हणून फोलीक सीड, कॅल्शीअम, आयर्न अशी दहा दिवसांची औषधे देण्यात आली आहेत.

## पालकमंत्री म्हणून मुख्यमंत्र्यांच्या पावलावर पाऊल टाकून काम करणार – शंभूराजे देसाई

**ठाणे :** ठाणे जिल्ह्याचे यापूर्वीचे तथा विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालकमंत्री म्हणून काम केले. त्यामुळे पालकमंत्री म्हणून आपण मुख्यमंत्र्यांच्या पावलावर पाऊल टाकून जिल्ह्यात काम करणार असल्याचे वक्तव्य राज्य उत्पादन शुल्क मंत्री आणि ठाणे जिल्ह्याचे नवनिर्वाचित पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी गुरुवारी ठाण्यात केले. पालकमंत्री म्हणून नियुक्ती झाल्यानंतर शंभूराज देसाई हे प्रथमच गुरुवारी ठाण्यात आले असताना, त्यांनी टेंभी नाका येथील शिवसेनेचे दिवंगत जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या आश्रमात जाऊन त्यांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले.

पुढे बोलताना, मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ठाणे जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन काम करीन अशी ग्वाहीही दिली, तसेच देसाई यांनी ठाणे जिल्हा हा खूप मोठा आहे. येथे काम करताना मुख्यमंत्री शिंदे हे ज्या सूचना देतील आणि जी दिशा दाखवतील तसेच काम करीन असे म्हटले. यावेळी देसाई यांना रश्मी ठाकरे याही गुरुवारी टेंभी नाका येथील देवीच्या दर्शन घ्यायला येणार आहेत. याबाबत विचारले असता . देवीचे दर्शन घ्यायला कोणालाच मनाई नाही. परंतु टेंभी नाक्याच्या देवीचा आशीर्वाद हा धर्मवीर आनंद दिघे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबरच पहिल्यापासून राहिला आहे. आमची श्रद्धा आहे की यापुढेही आम्ही आमचे मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जे कार्य करतो आहे, असेही ते पुढे म्हणाले.


हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# पालिकेच्या निधीची वाट न पाहता शैलेश पाटील यांनी दिला नागरिकांना दिलासा





**दिवा :–** माजी नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांनी श्री साई विहार कॉम्प्लेक्स,मुंब्रादेवी कॉलनी रोड,येथील नागरिकांच्या मागणीनुसार सोसायटीच्या परिसरात पाणी साचणाऱ्या भागात स्वखर्चाने खडी टाकून नागरिकांना दिलासा दिला आहे. पाणी साचून या भागात चिखल होत असल्याने येथे खडी टाकून सहकार्य करावे अशी मागणी येथील नागरिकांनी केली असता शैलेश पाटील यांनी स्वखर्चाने दोन गाडी खडी टाकून तेथील प्रश्न सोडवला. सोसायटीच्या सभासदांनी शैलेश पाटील यांचे आभार मानले आहेत.






जय अंबे मित्र मंडळ व राजे प्रतिष्ठान साबेगाव यांच्या वतीने आयोजित नवरात्र उत्सवात विराजमान देवीचे दर्शन घेताना मंडळाचेअध्यक्ष निलेश पाटील व सामाजिक कार्यकर्त्या अर्चना पाटील




**महाराष्ट्राचे सार्वजनिक व बांधकाम अन्न व नागरी पुरवठा मंत्री नामदार रविंद्र चव्हाण आयोजित, महाराष्ट्रातील सर्वात मोठा नवरात्री उत्सव नमो रमो नवरात्री उत्सवात विराजमान देवीची आरती करताना भाजप भटके विमुक्त आघाडीचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस शिवाजी आव्हाड,यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत कांबळे भाजपा मंडळाध्यक्ष नंदू जी जोशी दिनेश जी दुबे राजेंद्र वारे श्री लक्ष्मण पाटील व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# रमाकांत मढवी यांच्या हस्ते पदपथ दिव्यांचे उद्घाटन



दिवा:-मा.उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या प्रभाग सुधारणा निधीतून शिवसेना शाखा तिसाई नगर ते सुरेश भंडारी चाळ याभागात बसविण्यात आलेल्या पथदिव्यांचे उद्घाटन नुकतेच रमाकांत मढवी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मा.नगरसेविका ,दर्शना म्हात्रे, मा. नगरसेवक, दीपक जाधव, विभागप्रमुख, शशिकांत पाटील, चरणदास म्हात्रे, शरद पाटील ,राजेश पाटील शाखाप्रमुख, केशव पाटील, मनोज खंडागळे , दीपक मुंडे, भूषण पाटील,संतोष शिर्के, मच्छिंद्र म्हात्रे, सुरेश महाराणा, मंगेश गोविलकर, प्रशांत शहा, मारुती मोरे,दिनेश लांडगे, विजय रोकडे, आनंद खिलारी, सिद्धेश थोरवे महेश आंग्रे, प्रदीप गुरव,महिला पदाधिकारी, अणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# आदर्श मित्र मंडळातर्फे नवरात्री लोकोपयोगी उपक्रमाचे आयोजन

दिवा:-मुंब्रा देवी कॉलनी मधील आदर्श मित्र मंडळाच्या वतीने नवरात्री उत्सवानिमित्त देवीची स्थापना करण्यात आली आहे.मंडळाचे अध्यक्ष रोशन भगत यांच्या पुढाकाराने नुकताच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सुकन्या समृद्धी योजनेचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्या अंतर्गत लाभार्थ्यांना पासबुक वाटप नवरात्री उत्सवाच्या निमित्ताने करण्यात आले.

यावेळी भाजप शहर दिवा मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे,सरचिटणीस समीर चव्हाण, मंडळाचे अध्यक्ष रोशन भगत,सपना भगत आदी मान्यवर उपस्थित होते.



# दिवा मर्चंट सेवा संस्थेच्या माध्यमातून व्यापाऱ्यांना मार्गदर्शन व प्रमाणपत्र वाटप

**दिवा:–**दिवा मर्चंट सेवा संस्था या व्यापारी संघटने मार्फत शहरातील व्यापाऱ्यांना व्यवसाय मार्गदर्शन व संघटने मार्फत प्रमाणपत्र देण्यात आले.

संघटनेच्या अध्यक्षा ज्योती पाटील या व्यापाऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवत असतात. शहरातील व्यापाऱ्यांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी दिवा मर्चंट सेवा संस्थेच्या माध्यमातून ज्योती पाटील व त्यांचे सहकारी प्रयत्न करत असतात.शहरातील व्यापाऱ्यांना हक्काचे व्यसपीठ उपलब्ध व्हावे या हेतूने पाटील यांनी व्यापाऱ्यांच्या भेटी गाठी घेण्याचा उपक्रम सुरू केला आहे.व्यापारी वर्गातून ज्योती पाटील यांच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# दिव्यामधील नवरात्रौत्सवातील देवी



डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे मित्र मंडळ.
श्री मनोहर हरिश्चंद्र पाटील नगर साबेगाव दिवा पूर्व.



मुंब्रादेवी आई एकविरा मित्र मंडळ. विष्णू दादा अपार्टमेंट,
मुंब्रादेवी कॉलनी रोड ट्रान्सफॉर्मर्स जवळ दिवा (पूर्व)



जय अंबे मित्र मंडळ.
रौनक अपार्टमेंट मुंब्रादेवी कॉलनी दातिवली रोड दिवा (पूर्व)



श्री शिव समर्थ व्यासपीठ विठ्ठल मंदिर शेजारी साबेगाव दिवा पूर्व



राजे प्रतिष्ठान, डी.जे. कॉम्प्लेक्स.
श्रीमती यशोदा बाळाराम पाटील नगर साबेगाव दिवा पूर्व



जय अंबे मित्र मंडळ व जय अंबे महिला
मंडळ साबेगाव दिवा पूर्व

# स्पर्धा खेळण्यासाठी खेळाडूंना शैलेश पाटील यांचे सहकार्य,खेळाडूंनी मानले आभार!

## विजेत्या खेळाडूंचे शैलेश पाटील यांच्याकडून अभिनंदन!



**दिवा:**–महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशनच्या वतीने १२ वी राज्यस्तरीय पिंच्याक सिलॅट स्पर्धा नुकतीच नाशिक येथे उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील ३१ जिल्हे व ९ क्लब मधील ७०० खेळाडूंनी सहभाग घेतला. स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ किशोर प्रकाश येवले, राष्ट्रीय अध्यक्ष इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशन व महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिशन महासचिव यांच्या हस्ते पार पडला.

ठाणे शहर येथील दिवा विभागा मधुन ४५ खेळाडूंनी वरील स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला होता. या खेळाडूंना माजी नगरसेवक शैलेश पाटील यांनी आर्थिक सहकार्य केले. सीनिअर वयोगटात तसेच जुनियर वयोगटात ठाणे शहर व मुंबई उपनगर संघाने द्वितीय स्थान पटकावले. हा खेळ इंडोनेशियन मार्शल आर्ट चा प्रकार असून (१) टॅडिंग (फाईट) (२) तुंगल(सिंगल काता) (३) रेगू (ग्रुप काता) (४)गंडा (डेमो फाईट) (५) सोलो (क्रिएटीव्ह) या पाच प्रकारत खेळला जातो. १ सप्टेंबर २०२० ला या खेळाचा समावेश भारतीय क्रिडा मंत्रालय भारत सरकार यांनी आपल्या ५% नोकर भरती मध्ये केला आहे. या खेळाला युवक कल्याण आणि क्रिडा मंत्रालय भारत सरकार , भारतीय विश्वविद्यालय संघ, आखिल भारतीय पोलीस खेळ नियंत्रण बोर्ड, ऑलिंपिक काऊन्सिल ऑफ एशीयाची मान्यता आहे. हा खेळ एशियन गेम, एशियन मार्शल आर्ट गेम, युथ गेम, बिच गेम , ऑल इंडिया पोलीस गेम, भारतीय विश्वविद्यालय खेळ अशा ऑफिशियल राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये खेळला जातो. विजयी खेळाडूंचे अभिनंदन माजी नगरसेवक शैलेश पाटील यांनी केले.

## दिव्यामधील नवरात्रौत्सवातील देवी



सार्वजनिक नवरात्रौत्सव. दळवी नगर दातिवली गणेश नगर, दिवा आगासन रोड दिवा पूर्व


तिसाई मित्र मंडळ. दिवा आगासन, गणेश पाडा रोड, दिवा (पूर्व)


श्री साई सेवा नक्षत्र मित्र मंडळ, श्रद्धा सबुरी अपार्टमेंट कमलाकर नगर दिवा पूर्व.



दिवा विकास प्रतिष्ठान. श्री सद्‌गुरू कृपा मित्र मंडळ. दत्तकृपा निवास दिवा आगासन रोड दिवा पूर्व



सकाराम कॉम्प्लेक्स. दिवा आगासन रोड दिवा पूर्व


दि ग्रेट संदीप दादा प्रतिष्ठान, संदीप पाटील, नगर आगासन रोड दिवा (पूर्व)

# थापा पैशाने विकणारा माणूस नाही, तर तो निष्ठावंत माणूस – मुख्यमंत्री शिंदे यांचे उद्धव ठाकरे गटाला प्रत्युत्तर

**ठाणे:** बाळासाहेबांची सावली समजले जाणारे चंपासिंग थापा यांनी सोमवारी ठाण्यात मुख्यमंत्री शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. त्यानंतर, थापा यांच्यावर उद्धव ठाकरे गटाने मातोश्रीवरील कुत्रे फिरविणारा आणि लादी पुसणारा माणूस अशी टीका करत पैसे घेत त्यांनी प्रवेश केल्याचा आरोप केला. त्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर देताना, थापा हा पैशाने विकणारा माणूस नसून तो निष्ठावंत माणूस आहे. तसेच थापांवरील आरोप हा त्यांचा अपमान आहे. खऱ्या अर्थाने तो नेपाळी समाज आणि नेपाळी माणसाचा अपमान असे म्हणून त्याचा आपण जाहीर निषेध करतो, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

थापा यांच्या शिंदे गटातील प्रवेशानंतर त्यांच्यावर उद्धव ठाकरे गटाने थेट मातोश्रीवरील कुत्रे फिरविणारा आणि लादी पुसणारा अशी टीका करण्यात आली. तसेच त्याने पैसे घेऊन प्रवेश केला असा आरोपही केला गेला. त्या आरोपाला मुख्यमंत्री शिंदे यांनी सोमवारी रात्री उत्तर देताना ते कोणाला नोकर समजले त्याच्यामुळे त्यांची ही परिस्थिती झाली आहे. तसेच थापा हे मध्यंतरी आपणास येऊन भेटले होते.त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना नाराजी ही व्यक्त केली होती. तर हा माणूस पैशाने विकणारा नसून तो निष्ठावंत माणूस आहे. तो बाळासाहेबांसोबत अनेक वर्ष होता. बाळासाहेब आणि थापा हे समीकरण अखखा देशाने पाहिले आहे. त्यामुळे त्यांच्यावरील आरोप हा खऱ्या अर्थाने नेपाळी माणूस आणि समाजाचा अपमान आहे. त्याचा आपण जाहीर निषेध करतो असे शेवटी मुख्यमंत्री म्हणाले.

### लवकरच २० हजारांची पोलीस भरती

नुकताच कॅबिनेटमध्ये पोलीस भरतीबाबत निर्णय घेतला आहे. २० हजार जणांच्या भरतीत मोठ्या प्रमाणात महिला पोलीस दलात येतील, आणि त्या राज्याचा कायदा व सुव्यवस्था सांभाळतील असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

# महाराष्ट्राच्या राजकारणाला लाज वाटविणारे कृत्य मुख्यमंत्र्यांकडून – उद्धव ठाकरे गटाचा आरोप

**ठाणे :** टेंभी नाका येथील जय अंबे मातेच्या आगमनाच्या मिरवणुकीत मंगळवारी मुख्यमंत्र्यांनी बाळासाहेब ठाकरे यांचा केअर टेकर चंपा सिंग थापा व मोरेश्वर राजे यांना शिंदे गटामध्ये प्रवेश घेऊन महाराष्ट्र राजकारणात लाज वाटणारे कृत्य केले आहे. असा आरोप ठाण्यात झालेल्या पत्रकार परिषदेत ठाणे जिल्हा शिवसेना प्रवक्ते चिंतामणी कारखानी यांनी केला. दरम्यान, महाराष्ट्राचे श्रद्धास्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टेंभी नाका जय अंबे मातेच्या देवीच्या आगमन मिरवणुकीत चंपा सिंग थापा व मोरेश्वर राजे यांनी आम्हास पाठिंबा असल्याचे जाहीर करून प्रवेश घेतला. यामध्ये मुख्यमंत्र्यांना काय साध्य करायचं होत ? सत्तेची मस्ती की स्वतःचा मोठेपणा? मातोश्रीवर बाळासाहेबांच्या सेवेसाठी अनेक सेवेकरी काम करत होते आणि आहेत. त्यामध्ये सफाई कामगार, जेवण बनवणारे वाढपे, सुरक्षारक्षक असे अनेकांचा समावेश आहे. यांचाही प्रवेश शिंदे गटात करून घेणार की काय? असा सवाल त्यांनी केली.

मुख्यमंत्र्यांच काम हे राज्याची धुरा वाहण्याच आहे. परंतु मुख्यमंत्री ठाकरे घराण्यावरील द्वेषापोटी अत्यंत खालच्या दर्जाचे राजकारण करीत आहेत. त्यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये किंवा निवासस्थानी हा प्रवेश घडून आणला असता तर एकवेळ क्षम्य होत. परंतु भर रस्त्यात ते सुद्धा देवीचे आगमन होत असताना केलेले हे कृत्य मुख्यमंत्र्यांना शोभणारे नाही. असेही म्हटले आहे.

थापा हे बाळासाहेब ठाकरे यांच्या घरी केअर टेकर म्हणून काम करत होते. शिवसेना प्रमुख त्यांची अत्यंत काळजी घेत होते. शिवसेना प्रमुख स्वर्गवासी झाल्यानंतर थापा यांनी नेपाळला जाण्याचे ठरवले त्यावेळी सुद्धा त्यांना नेपाळला गेले. पण ते पुन्हा मुंबईला आले. नोकरी सोडल्यामुळे त्यांना मातोश्री वरती पुन्हा रुजू करून घेतले नसावे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या विरोधामध्ये एकनाथ शिंदे यांच्याकडे ते गेले असावेत. परंतु मुख्यमंत्र्यांनी मात्र या गोष्टीचे भांडवल करत त्यांचा प्रवेश धार्मिक मिरवणुकीत करून घेतला हे कृत्य योग्य नसल्याचेही ठाणे जिल्हा शिवसेना प्रवक्ते चिंतामणी कारखानी यांनी म्हटले आहे.

# एम. देवेंदर सिंह यांनी स्वीकारला रत्नागिरी जिल्हाधिकारी पदाचा पदभार



**रत्नागिरी:–** एम.देवेंदर सिंह यांनी रत्नागिरीच्या जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला. मावळते जिल्हाधिकारी डॉ. बी. एन.पाटील यांच्याकडून त्यांनी पदाची सुत्रे हाती घेतली. पुणे येथे असलेल्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे संचालक म्हणून देवेंदर सिंह कार्यरत होते. तर मावळते जिल्हाधिकारी डॉ.बी.एन.पाटील यांची मुंबई येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळावर नियुक्ती झाल्याने बदलून जात आहेत. पुणे येथे संचालक पदापूर्वी त्यांनी आधी अकोला आणि चंद्रपूर येथे जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी व नंतर यवतमाळ व बीड येथे जिल्हाधिकारी म्हणून काम केलेले आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील २०११ च्या बॅचचे आय.ए.एस. अधिकारी आहेत. प्रशासकीय सेवेत येण्यापूर्वी त्यांनी दिल्ली येथे बँकिंग क्षेत्रात सेवा बजावलेली आहे. ५ वर्षांच्या या खाजगी क्षेत्रातील बँक सेवा कालावधीत रिझर्व बँक ऑफ इंडिया अशी त्यांच्या कामाचा निकटचा संबंध होता.

देवेंदर सिंह यांनी आयआयटी रुडकी येथून संगणक अभियांत्रिकी व नंतर एम.बी.ए केलेले आहे. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयात स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी सदीच्छा भेटीसाठी आलेल्या पत्रकारांशीही संवाद साधला.

# खैराची तोड करणाऱ्यांवर कारवाईसाठी गेलेल्या वनविभागाच्या कर्मचाऱ्यांवर दगडफेक

**मंडणगड –** उत्तर रत्नागिरीतील मंडणगड या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जंगलतोड सुरू असून यामध्ये खैर जातीच्या वृक्षाची मोठ्या प्रमाणात कत्तल सुरू आहे. रंग तसेच कात बनविण्यासाठी खैर वृक्षाच्या नाराचा उपयोग होत असल्याने लाकूड माफियांची वक्रदृष्टी खैरावर पडली आहे. मंडणगड तालुक्यातील लाटवण– कादवण परिसरात खैर वृक्षाची तोड सुरू आहे. कारवाई करण्यासाठी जाणाऱ्या वनविभागातील एका कर्मचाऱ्यावर दगडफेक केल्याचा प्रकार मंडणगड तालुक्यातील लाटवण कादवण परिसरात मंगळवारी घडला होता. दगडफेक केल्या प्रकरणी शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे मात्र जंगलाचे संगोपन आणि संरक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडून मौन पाळले जात असल्याने लाकूड माफियांना अभय कुणाचे? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

मंडणगड तालुक्यात लाटवण कादवण परिसरात खैराची तोड होत असल्याची माहिती वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना मिळाली. दिनांक २७ रोजी (मंगळवारी) कर्मचारी माहिती घेण्यासाठी वृक्ष तोड होत असलेल्या परिसरात गेले. मात्र तेथे त्यांच्यावर बेचकीच्या सहाय्याने दगडफेक करण्यात आला. त्यानंतर वन खात्याने अनेक अधिकारी, कर्मचारी मंडणगडमध्ये दाखल झाले. त्यांनी सुमारे दोन लाखांची खैराची तोडलेली झाडे जप्त केली असल्याचे समजते.

# लांजात १५ सरपंचपदांसाठी ५२ तर १२१ सदस्यपदांचे २४८ उमेदवारी अर्ज वैध

## कोचरी व शिरवली सरपंचपदे बिनविरोध, २७ सदस्य बिनविरोध | शिरवली ग्रामपंचायत पूर्णतः बिनविरोध

**लांजा :** लांजा तालुक्यातील एकूण १५ ग्रामपंचायतींच्या १५ सरपंच पदांसाठी दाखल झालेले ५२ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. तर १२१ सदस्यपदांसाठी दाखल झालेले तब्बल २४८ उमेदवारी अर्जही वैध ठरले आहेत. कोचरी व शिरवली या दोन ग्रामपंचायतींचे सरपंच पदे बिनविरोध झाली. तर १५ ग्रामपंचायतीतील २७ सदस्य बिनविरोध निवडून आले. १५ पैकी शिरवली ग्रामपंचायत बिनविरोध झाली आहे.

१५ ग्रामपंचायतीच्या निवडणूका ऑक्टोबर महिन्यात होणार असल्याने या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांची लगबग सुरु झाली आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेल्या ग्रामपंचायतीमध्ये वेरवली बुद्रुक, प्रभानवल्ली, कोचरी, गोविळ, कोर्ले, शिरवली, व्हेळ, रिंगणे, हर्चे, झापडे, कोंड्ये, गवाणे, कोलधे, देवधे, उपळे यांचा समावेश आहे. उमेदवारी अर्ज छाननी प्रक्रियेत एकूण १५ सरपंच पदांसाठी ५२ अर्ज प्राप्त झाले होते. छाननी अंती सदरचे सर्व अर्ज वैध ठरले आहेत. त्यापैकी कोचरी व शिरवली या दोन्ही ग्रामपंचायतींचे सरपंचपद बिनविरोध झाले. उर्वरित १३ ग्रामपंचायतींच्या १३ सरपंचपदासाठी ५० उमेदवार निवडणूक रिंगणात राहिले आहेत. एकूण २४८ अर्जांची छाननी केली असता सर्वच अर्ज वैध ठरले. शिरवली ग्रामपंचायतीच्या प्रभाग १ मधील नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव जागेसाठी एकही अर्ज न प्राप्त झाल्याने सदरची जागा रिक्त राहिली आहे. यामुळे शिरवली ग्रामपंचायत पूर्णतः बिनविरोध झाली आहे. आता १४ ग्रामपंचायतींच्या ९३ जागांसाठी २२१ उमेदवार निवडणूक रिंगणात राहिले आहेत.

# एसटीला गणपती हंगामात ५ कोटी ३५ लाखांचे उत्पन्न

**रत्नागिरी /प्रतिनिधी :** दोन वर्षांच्या कोरोना काळातील बंद झालेली एसटीची सार्वजनिक वाहतूक आणि त्यानंतरच्या एसटी कर्मचाऱ्याच्या ५ महिन्याच्या संपातून सावरत यंदाच्या गणेशोत्सवात एसटीला सुमारे ५ कोटी ३५ लाखांचे उत्पन्न मिळाले आहे. मात्र एसटी कर्मचाऱ्यांचा बंदचा मोठा फटका महामंडळाला बसला आहे. एसटीचे नियमित असलेल्या प्रवाशांनी त्या काळात अन्य पर्याय निवडल्याने एसटीचे हे २० टक्के प्रवासी कायमचे तुटल्याची माहिती पुढे आली आहे.

मात्र एसटीला मोठा हात दिला तो यंदाच्या गणेशोत्सवाने. दोन वर्षानंतर गणेशभक्त श्रीगणेशाची प्रतिष्ठापना करण्यासाठी गावाकडे येणार होते. त्यामुळे एसटीने त्याचे योग्य नियोजन केले. गणेश चतुर्थीपूर्वी एसटीच्या १ हजार ५८० फेऱ्या सुरू होत्या. ६ लाख २१ हजार किमीच्या या फेऱ्या झाल्या. ७५ हजार प्रवासी एसटीने जिल्ह्यात आणले. यातून २ कोटी ६० लाखांचे उत्पन्न एसटीला मिळाले तर चाकरमान्यांच्या परतीच्या प्रवासासाठी १ हजार ८०० फेऱ्या सोडण्यात आल्या. सव्वासह लाख किमीच्या फेऱ्या झाल्या. ८० हजार चाकरमान्यांची वाहतूक एसटीने केली. यातून २ कोटी ७५ लाख एवढे उत्पन्न मिळाले. यंदाच्या गणेशोत्सवात ५ कोटी ३५ लाखांचे उत्पन्न मिळाल्याने एसटीला सावरण्यास मोठी मदत झाली.

# संगमेश्वरमध्ये डॉक्टरला घातला हजारोंचा ऑनलाईन गंडा

**संगमेश्वर (वार्ताहर) –** संगमेश्वर तालुक्यातील कडवई येथे अज्ञाताने एका डॉक्टरला गंडा घातल्याची घटना समोर आली आहे. वीजबिल अपडेट न केल्याने वीज कनेक्शन खंडित करण्यात येईल, असा मेसेज व्हॉट्सअपवर आल्यानंतर समोरील व्यक्तीने डॉक्टर याना एक लिंक पाठवली. या लिंकवरून आपली अकाउंटची माहिती दिल्याने २४ हजार ७९९ हजाराची ऑनलाईन फसवणूक केली. डॉ. मयुरेश विलास पुरोहित यांच्या मोबाईलवर व्हॉट्सअपवर वीजबिल अपडेट न केल्याने वीज कनेक्शन खंडित करण्यात येईल, असा मेसेज आला. हा मेसेज तिने पती मयुरेश यांना फॉरवर्ड केल्यानंतर त्यांनी त्या नंबरवर कॉल केला असता समोरच्या व्यक्तीने वीजबिल अपडेट करण्यासाठी लिंक पाठवत आहे, असे सांगत १० रुपये भरण्यास सांगितले. मयुरेश याने लिंकद्वारे १० रुपये भरले. त्यानंतर त्यांच्या खात्यामधून २४ हजार ७९९ रुपये ऑनलाईन काढल्याचे लक्षात आहे. आपली फसवणूक झाली लक्षात आपल्यानंतर त्यांनी बँक ऑफ इंडिया शाखा, कडवईमध्ये जाऊन आपले अकाऊंट लगेच बंद केले.

# मुंबई विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये गोगटे जोगळेकर महाविद्यालयाला इन्स्टॉलेशन कलाप्रकारांमध्ये कास्यपदक प्राप्त

**मुंबई –** मुंबई विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये मुंबईमध्ये झालेल्या अंतिम फेरीमध्ये इन्स्टॉलेशन स्पर्धेत गोगटे जोगळेकर महाविद्यालयामधील अक्षय वहाळकर, हर्ष कांबळे,पायल मोहिते, हलिमा पाटणकर विद्यार्थ्यांना कास्यपदक प्राप्त झाले आहे. सक्सेस हा विषय इन्स्टॉलेशनसाठी आला होता सांस्कृतीक विभाग प्रमुख डॉ.आनंद आंबेकर यांनी सातत्यपूर्ण प्रॅक्टिस करून घेऊन संघ तयार केला होता . प्रा.शुभम पांचाळ संघ व्यवस्थापक म्हणून मुंबई मध्ये काम पाहिले. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.



आनंद आंबेकर यांनी अभिनंदन केले आहे. तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी आणि पालक यांनी सुद्धा अभिनंदन केले आहे.



# आंबा घाटात वळणावर ट्रकला अपघात; महिला ठार, १ गंभीर

**कोल्हापूर–** रत्नागिरी महामार्गावरील आंबा घाटात काल गुरुवारी एक ट्रक नियंत्रण सुटल्याने डावीकडील डोंगरकड्यावर आदळून त्यात एक महिला ठार झाली. तर एकजण गंभीर आहेत. ट्रकचा चालक फरार आहे.

याबाबतची माहिती अशी– काल ट्रक एमएच ११– डी डी ०९६७ कोल्हापूरहून जयगडकडे चालला होता. त्यात रत्नागिरीकडे जाणारे काही प्रवाशी बसले होते. हा ट्रक आंबा घाटात आला असता त्यावेळी एका चक्री वळणावर चालकाचे नियंत्रण सुटले. त्यानंतर ट्रक घाटातील डाव्या बाजूच्या डोंगरकड्यावर जोरात आदळला.

या अपघातात त्यातील प्रवाशी महिला सोनाबाई सखाराम लावनदे, (वय ५८) या ठार झाल्या. त्यातील दुसरे प्रवाशी ज्योतीबा बाबुराव लवंडे, (वय ५२)हे गंभीर जखमी आहेत.

# ठाणे पालिकेच्या अत्यावश्यक विभागातील कर्मचारी वाऱ्यावर

## ठेकेदाराकडून तुटपुंजे वेतन, विम्याचे कवचही नाही

**ठाणे :** आग, पाऊस, अपघात, पडझड अशा आपत्तीकाळात जीवाची बाजी लावून लढणाऱ्या ठाणे महापालिकेच्या प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षातील कर्मचाऱ्यांना महापालिका प्रशासनाने अक्षरशः वाऱ्यावर सोडले आहे. तुटपुंजे वेतन, विम्याचे नसलेले कवच, सुरक्षिततेचे अपुरे साहित्य अशा समस्यांना तोंड देत लाखो ठाणेकरांचा बचाव या कर्मचाऱ्याकडून केला जातो. अत्यावश्यक सेवेतील या कर्मचाऱ्यांना ठोक मानधन तत्वावर सेवेत सामावून न्याय मिळवून द्यावा तसेच संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने संदीप पाचंगे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांच्याकडे केली आहे.

याप्रश्नी मनसेच्या शिष्टमंडळाने बुधवारी अतिरिक्त आयुक्तांची भेटही घेतली असून त्यांनी कर्मचाऱ्यांना योग्य न्याय देण्याचे आश्वासन दिले आहे.

एनडीआरएफच्या धर्तीवर ठाणे महापालिकेत प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्ष उभारण्यात आला आहे. मुख्य नियंत्रण कक्ष असलेल्या या विभागात २४ ु ७ कर्मचारी कार्यरत असतात. या विभागामध्ये डयुटी ऑफिसर, शिफ्ट इन्चार्ज, संगणक चालक, टेलिफोन व वायरलेस ऑपरेटर या पदावर कंत्राटी कर्मचारी मागील कित्येक वर्षापासून कार्यरत आहेत. पावसाळ्यात दुर्घटनाग्रस्त नागरिकांना मदत करणे, घटनास्थळी त्वरीत मदत पोहचवणे, दरड कोसळणे, वादळ, वीज कोसळणे, लिफ्ट दुर्घटना, घरात पाणी शिरणे, झाड पडणे, जमीन खचणे अशा अनेक प्रसंगी नागरिकांना या विभागामार्फत मदत केली जाते. कोविड काळात पहिल्या व दुसऱ्या लाटेत नागरिकांना सर्वतोपरी मदत या विभागातील कर्मचाऱ्यांमार्फत पुरवली. मात्र या अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना ठाणे महापालिकेने ठेकेदाराला दिलेल्या रकमेच्या तुलनेत अगदीच तुटपुंजे वेतन दिले जाते. सुरक्षेकरिता लागणारे साहित्य, विमा कवच आदी बाबींची पूर्तता करण्यात येत नाही. त्या पुरवून या सर्व कर्मचाऱ्यांना हक्काच्या सोयीसुविधा देण्याची मागणी मनसेचे विभाग अध्यक्ष संदीप पाचंगे यांनी आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांना निवेदनाद्वारे केली. तसेच संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी, असेही पाचंगे यांनी निवेदनात नमूद केले आहे.



## दिघेंच्या बहिणीने घेतले देवीचे दर्शन

**ठाणे:** दिवंगत धर्मवीर आनंद दिघे यांनी सुरू केलेल्या टेंभीनाक्यावरील नवरात्रोत्सवाची परंपरा विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू ठेवली आहे. या नवरात्रोत्सवाला भेट देण्याबाबतचे निमंत्रण मुख्यमंत्री शिंदे यांनी धर्मवीर आनंद दिघे यांच्या बहीण अरूणा सुधीर गडकरी यांना दिले होते. हे निमंत्रण स्वीकारुन बुधवारी अरुणा गडकरी यांनी टेंभीनाक्यावरील नवरात्रोत्सवाला भेट देवून संपूर्ण परिवाराने देवीची पूजा व आरती केली.

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची मंत्र्यांनी केली कानउघडणी



## घोडबंदर रोडच्या खराब रस्त्यांवर अधिकाऱ्यांना घेतले फैलावर

### मनसेच्या आंदोलनानंतर मंत्र्यांनी घेतली दखल

***एमएसआरडीएस प्राधिकरणाच्या अखत्यारित वाघबीळ,हिरानंदानी ईस्टेट, कापूरबावडी येथील पुलाचे दोषदायित्व कालावधी या महिन्यात संपत असून सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलांचे हस्तांतर एमएसआरडीसी कडून घेण्याअगोदर संबंधित पुलाच्या रस्त्याची डागडुजी संबंधित एमएसआरडीसीनी नियुक्त केलेल्या ठेकेदाराकडून करून घ्यावी. जेणेकरून या पुढे या पूलांच्य रस्त्यांचे नियोजन ठेवणे आवश्यक आहे.***

*– स्वप्नील महिंद्रकर, शहर अध्यक्ष, मनसेचे जनहित विधी विभाग*

**ठाणे:** घोडबंदरवरील रस्त्यांमुळे अनेक युवकांचा गेलेला बळी असो किंवा दोन-दोन तास वाहूक कोंडी असो याचा सर्वसामान्य ठाणेकरांना दररोज त्रास सहन करावा लागतो. यामुळे चार दिवसांपूर्वी याप्रश्नी मनसेच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते. याची दखल मंत्र्यांनी घेतली असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघणी केली आहे. यामुळे आता अधिकारीही जागे झाल्याने या रस्त्यावरचे कामही सुरू झालेले पहायला मिळत आहे.

गेल्या दीड वर्षांपासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे घोडबंदरचा रस्ता असून ही या रस्त्याच्या दुरूस्तीचे काम केले जात नव्हते. निधी नसल्यामुळे हे काम होत नसल्याचे अधिकाऱ्यांनी कारण पुढे केले. मात्र ज्यावेळी मंत्र्यांनी या घोडबंदर रस्त्याची चौकशी केली असता, निधीचा प्रश्न नसल्याचे विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे मंत्र्यांनी त्या अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेत कानउघडणी केली. आठ दिवसात या रस्त्याचे काम करण्याच्या सूचना दिल्या असून शुक्रवारपासून या मार्गावरील रस्त्याच्या दुरूस्तीचे काम सुरू झाले आहे.

मनसेचे ठाणे शहर अध्यक्ष जनहित व विधी विभागाचे स्वप्नील महिंद्रकर आणि उपशहर अध्यक्ष पुष्कर विचारे यांच्या वतीने करण्यात आलेल्या आंदोलनानंतर अवघ्या चार दिवसात मंत्र्यांनी दखल घेत कामाला सुरूवात झाल्यामुळे नागरिकांनी दिलासा व्यक्त केला आहे.

# प्लास्टिकच्या रॉ मटेरियलला आग

## आगीत मोठे नुकसान



**ठाणे:** शिळ, महापे रोडवरील पेट्रोल पंप जवळ, मुनिर कंपाऊंड, ठाकूर पाडा येथे मशिनरी,पॅकिंग व प्लास्टिकचे रॉ मटेरियलला आग लागल्याची घटना बुधवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत प्लास्टिकचे रॉ मटेरियल व इतर साहित्यही जळून खाक झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा कोणालाही दुखापत झालेली नाही. तर,आगीवर नियंत्रण मिळविण्यात मुंब्रा अग्निशमन दलाच्या जवानांना यश आल्याची माहिती ठामपा आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

शीळ येथील मुनीर कंपाऊंड येथे नुरुल्ला खान पठाण यांचा १२०० स्क्वेअर फूटाचा गाळा आहे. तेथे मे. फॅब्रिकेशन मटेरियल अँड मॅन्युफॅक्चरिंगचे काम चालते. त्या कामासाठी तेथे मशिनरी, पॅकिंग व प्लास्टिकचे रॉ मटेरियल आणले होते. त्याला बुधवारी पहाटे आग लागली. या आगीची माहिती मिळताच, घटनास्थळी डायघर पोलीस, अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली होती. तर लागलेली आग अग्निशमन दलाच्या जवानांनी पूर्णपणे नियंत्रणात आणल्यावर परिस्थिती आटोक्यात आली. या आगीमुळे गाळ्यामधील मशिनरी व पॅकिंग व प्लास्टिक चे रॉ मटेरियल जळून नुकसान झाले आहे. तर या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा कोणालाही दुखापत झालेली नाही. तसेच ही आग आटोक्यात आणण्यासाठी घटनास्थळी १- फायर वाहन, १- रेस्क्यू वाहन, १- वॉटर टँकर पाचारण केले होते अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# ठाकरे सरकारने रोखलेल्या प्रकल्पांची श्वेतपत्रिका जारी करण्याची मागणी

## वैधानिक विकास मंडळाच्या स्थापनेचे भाजपकडून स्वागत

**ठाणे:** वसुली आणि वाटाघाटी एवढाच कार्यक्रम राबविणाऱ्या ठाकरे सरकारने गुंडाळलेली वैधानिक विकास मंडळे पुन्हा स्थापन करण्याचा निर्णय घेऊन शिंदे-फडणवीस सरकारने विकासाचा मार्ग पुन्हा मोकळा केला आहे, अशा शब्दांत भाजपचे ठाणे शहराध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांनी युती सरकारचे अभिनंदन केले आहे. केवळ राज्यपालांविषयीचा आकस आणि त्यांच्या अधिकारावर गदा आणण्यासाठी ठाकरे सरकारने राज्याच्या विकासालाच खीळ घातली आणि वसुलीचा एकमार्गी कार्यक्रम राबविला, अशी टीकाही त्यांनी केली.

विकास कार्यक्रमांसाठी निधी वाटपाचे अधिकार राज्यपालांच्या हाती गेले, तर वसुली आणि वाटाघाटींचे मार्ग बंद होतील या भीतीने ठाकरे सरकारने वैधानिक विकास मंडळाची मुदत वाढविण्यासाठी प्रयत्न केले नाहीत असा आरोप करून श्री. डावखरे म्हणाले की, ठाकरे आणि राज्यपाल यांच्यातील कुरघोडीच्या राजकारणामुळे राज्याचा विकास दोन वर्षे रखडला असून विकासाचा अनुशेष आणखी वाढला आहे. एप्रिल २०२० मध्ये वैधानिक विकास मंडळांची मुदत संपल्यानंतर ठाकरे सरकारने जाणीवपूर्वक मुदतवाढीचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविणे टाळले, त्यामुळे दोन वर्षांत मराठवाडा, विदर्भ, आणि उर्वरित महाराष्ट्राच्या विकासाचे अनेक प्रश्न मार्गी लागले नाहीत. राज्याच्या विकासास खीळ घालण्यास ठाकरे सरकारच जबाबदार आहे. ठाकरे सरकारने रोखलेल्या व महाराष्ट्राच्या विकासास खीळ घातलेल्या विकास प्रकल्पांची व त्यामुळे त्यांच्या सत्ताकाळात झालेल्या अधोगतीची माहिती राज्याला देण्यासाठी श्वेतपत्रिका जारी करा, अशी मागणीही श्री. डावखरे यांनी शिंदे सरकारकडे केली. वैधानिक विकास मडळांची पुन्हा स्थापना करण्यासाठी पाठपुरावा केल्याबद्दल श्री. डावखरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.

वैधानिक विकास मंडळांची स्थापना झाल्यानंतर १९९४ नंतर प्रथमच ठाकरे सरकारमुळे ३० एप्रिल २०२० पासून या मंडळांचा कारभार ठप्प झाला. त्याआधी राज्यातील विकासाचा अनुशेष झपाट्याने कमी होऊन उर्वरित महाराष्ट्रात अपेक्षेपेक्षा जास्त गुंतवणूक झाली होती. वैधानिक विकास मंडळे पुन्हा स्थापन करण्याच्या शिंदे सरकारच्या निर्णयामुळे ठाकरे सरकारने रोखलेला विकासाचा गाडा आता रुळावर येईल असा विश्वास डावखरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे व्यक्त केला.



शिवलिला सार्वजनिक उत्सव मंडळ. शिवलिला अपार्टमेंट मुंब्रादेवी कॉलनी दिवा (पूर्व) ठाणे.



ॐ श्री साईलिला मित्र मंडळ.
गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व) ४००६१२




# टेंभी नाक्यावरील आंबे मातेच्या आरतीचा पहिल्यांदाचा मान आमदार संजय केळकर यांना

**ठाणे:** महाराष्ट्रात प्रसिद्ध आणि आनंद दिघेंची देवी म्हणून नावलौकिक असलेल्या ठाणे येथील टेंभीनाक्यावरील आंबेमातेच्या आरतीचा पहिल्यांदाच मान ठाणे शहर मतदारसंघाचे भाजप आमदार संजय केळकर यांना सहपत्नी ( कमल संजय केळकर ) मिळाला. हा मान नवरात्री उत्सव स्थापनेच्या तब्बल ४४ वर्षांनी मिळाल्याने जणू तो योगायोग म्हणावे लागणार आहे. देवीच्या आरतीची संधी म्हणजे एकप्रकारे देवीचा आशीर्वादच म्हटले तर आश्चर्य किंवा चमत्कार झाला असे बोलले जाते.

दिवंगत दिघे आणि आमदार संजय केळकर यांचे नाते हे मैत्रीच्या ही पलीकडचे होते. त्यांची ती मैत्री जगजाहीर होती. दरम्यान दिघे यांनी टेंभीनाक्यावर स्वपक्षीय नवरात्री उत्सवाला सुरवात केली. तेंव्हापासून आमदार केळकर हे न चुकता नित्यनियमाने टेंभीनाक्यावरील आंबेमातेच्या दर्शनाला आवर्जून जातात. मात्र, दिघे यांच्या उपस्थितीत किंवा त्यांच्या निधनाच्या पाश्चात्य मित्रपक्षाचा आमदार म्हणून कधी वैयक्तिक किंवा सहपत्नी केळकर यांना देवीची आरती करण्याचे संधी चालून आली नाही किंवा मिळालीच नव्हती. पण, नुकतेच महाराष्ट्रात सत्तातंर झाले आणि हिंदुत्वाच्या आणि बाळासाहेबांच्या विचारांच्या मतावर शिवसेना व भाजप या युतीचे सरकार स्थापन झाले. त्यातच, मुख्यमंत्रीच्या खुर्चीवर विराजमान होण्याचा मान ठाणे जिल्ह्याचे एकनाथ शिंदे यांना मिळाला. तर, शिंदे हे स्वर्गीय आनंद दिघे यांच्या निधनानंतर त्यांचे प्रतिबिंब म्हणून नाव रूपास आले होते. धर्मवीर आनंद दिघे यांनी सुरू केलेल्या या उत्सवाची परंपरा विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अव्याहतपणे सुरू ठेवली आहे. त्यातच शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदा हा उत्सव साजरा होत असल्याने सर्वांचे या उत्सवाकडे डोळे लागून आहे. या उत्सवाला राजकीय मंडळींची हजेरी महत्त्वाची मानले जात असताना, मंगळवारी सायंकाळी युतीचे आणि ठाणे शहर मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा आमदार म्हणून विजयश्री झालेले संजय केळकर हे सहपत्नी टेंभीनाक्यावर देवीच्या दर्शनाला गेले होते. तसा हा योगायोग म्हणा किंवा नव्या युतीचा पाय गुण म्हणा. नवरात्री उत्सवाच्या स्थापनेनंतर म्हणजे ४४ वर्षांनी पहिल्यांदाच त्यावेळी कळत-नकळत केळकर दाम्पत्याच्या हस्ते देवीच्या आरतीचा योग आला आणि या दाम्पत्याने मनोभावे देवीची आरती केली. तसेच हे केळकर दाम्पत्याचे भाग्यच म्हणावे लागले, असे त्यांच्या काही निकटवर्तीयांचे म्हणणे आहे.


नवरूप मित्र मंडळ.
प्रशांत नगर, मुंब्रा देवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व)


ठाण्यातील जिजामाता नगर भागातील कोकण रहिवाशी मित्र मंडळ आयोजित नवरात्रौत्सवातील अंबा मातेची सुरेख मुर्ती भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. मंडळाचे यंदाचे १७ वे वर्ष असून अध्यक्ष दत्ता पाजवे व उपाध्यक्ष चेतन बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा संपन्न होत आहे.